
प्रदीप प्रगती मंडळ, ठाणे
(वाचनालय विभाग)

गी दलरी
अनुवाद
प्रा. उमाशशी भालेराव

# गंगेचा राखणदार

ऐतिहासिक कादंबरी



कॉन्टिनेन्टल प्रकाशन
विजयानगर, पुणे ३०

किती निष्ठा होती हे आम्हाला माहीत आहे. इथे आम्ही एकटेच सैन्यप्रमुख हजर असल्याने, आम्ही तुम्हाला कळविण्याची सवलत घेतो की तुम्हाला सरदारांकडून मिळालेल्या आदेशानुसार आपले लष्कर, तोफा, शस्त्रात्रे व इतर सामान घेऊन शक्य तितक्या तातडीने आम्हाला येऊन मिळावे. पुढील काही दिवसात तुम्ही इथे पोहोचाल अशी आशा करतो. आम्ही आपली वाट पहात आहोत.

अंबाजी इंगळे
सेनापती

शिंद्यांच्या सर्व सेनापतींपैकी अंबाजी इंगळेबद्दल पेरॉंला सर्वात कमी आदर होता. पाटणच्या लढाईत त्यांनी दगा दिला होता आणि त्याबद्दल पेरॉं अंबाजी इंगळेला माफ करू शकला नव्हता. इतर अधिकाऱ्यांबरोबर दुटप्पीपणे वागून फसवणूक करण्याबद्दल अंबाजी इंगळे कुप्रसिद्ध होता. इंगळेंचा हुकूम तातडीने पाळण्याची गरज नाही असे ह्या फ्रेंच पेरॉंने ठरविले. शेवटचा लखोटा वाचल्यावर आपली वागणूक योग्यच असल्याची पेरॉंची खात्री पटली. हैद्राबादच्या निजामाच्या दरबारी पेशव्यांचे प्रतिनिधी असलेले गोविंदराव काळे यांचे ते पत्र होते.

पुणे
१३ फेब्रुवारी १७९४

पेरूसाहेब,

तुम्हाला माझी आठवण आहे का ते मला माहीत नाही. तुम्ही चौल बंदरात जहाजावरून उतरलात तेव्हा धनुष्यबाण घेऊन एका मुलाने तुमचे स्वागत केले होते ते आठवते का ? माझी नेमणूक आता हैद्राबाद दरबारी झाली आहे. सरदार शिंदे यांचा सल्ला घेणे योग्य होईल असे मला वाटले होते. हैद्राबादच्या निजामावर चढाई करण्याचा विचार नाना फडणीसांनी सोडून द्यावा यासाठी सरदारांनी आपले सर्व वजन खर्च करून त्यांचे मन वळवावे अशी मी सरदारांकडे याचना केली होती. कारण निजाम हे नेहमीच आपले दोस्त रहाण्याचा प्रयत्न करतात. ह्या दोन्ही राज्यातील लढाई अतिशय निंद्य ठरेल. आपल्या मृत्यूपूर्वी काही दिवस सरदारांनी आम्हाला खात्रीपूर्वक सांगितले होते की अशा प्रकारच्या चुकीच्या मोहीमेत ते कधीच भाग घेणार नाहीत. हा त्यांचा निर्णय मान्य करण्यास त्यांनी नाना फडणीसांना भाग पाडले होते. पण आता सरदार शिंदे राहिले नाहीत. त्यामुळे काय होईल समजत नाही. तुम्हाला पूर्वसूचना देत आहोत. अशी चढाई तुम्हाला आत्मघातकी ठरेल. तुमच्याप्रमाणे हैद्राबादच्या निजामाकडेही जनरल रेमॉं च्या शिक्षणाखाली तयार झालेले उत्तम लष्कर आहे. निजामावर हल्ला केल्यास तुम्हाला तुमच्या देशबंधूशीच लढावे लागेल. आपल्या जुन्या मैत्रीला स्मरून आम्ही तुम्हाला सांगतो; उज्जैनलाच रहा !

गोविंदराव काळे.



पेरॉंने सर्व खलिते नीट गुंडाळून ठेवले. मात्र पत्रांमधील अक्षर अन् अक्षर तो मनातल्या मनात पुन्हा वाचीत होता. '' येऊ नकोस. '' मधूने सांगितले. '' उज्जैनला रहा. '' गोविंदराव काळेंनी पुन्हा तेच सांगितले. नारळाच्या झाडापाशी उघड्या अंगाने उभा असलेला बेफिकीर मुलगा पेरॉंला नीट आठवत होता. आता 'वकील' झाल्यामुळे त्याच्या अंगावर श्रीमंती कपडे असतील. तो अंगानेही भरला असेल आणि हुषारही झाला असणार. '' निघून ये '' लबाड अंबाजी इंगळेंनी कळविले. पण पेरॉं जाणार नव्हता. परंतु जर नव्या सरदारास चुकीचा सल्ला दिला गेला आणि त्याने जर सरदारांचा मूळ आदेशच उलटविला तर काय करणार ?

## - ४ -

ते सर्वजण खड्र्यास होते. दैवानेच सर्वांना हिंदुस्थानातीलच नव्हे तर जगातील चारी बाजूनी आणविले होते. फ्रेंच आणि हिंदुस्थानी, हिंदू आणि मुसलमान, ब्राह्मण आणि मराठा ! अगदी क्षुल्लक पोकळ दुरभिमानापायी हे सर्व एकमेकासमोर लढाईला उभे होते. हे सर्व टाळता आले असते. मराठ्यांच्या विरुद्ध मराठे, मोगलांच्या विरुद्ध मोगल आणि फ्रेंचाच्या विरुद्ध फ्रेंच उभे होते. सगळ्यांनाच आत्मघातकी असणारा हा खेळ लवकर संपावा असे प्रत्येकास वाटत होते.

इतक्या लहान भूमीवर इतक्या प्रचंड संख्येने सैनिक जमल्याचे पेरॉंने कधीच पाहिले नव्हते. दोन लाख सत्तावीस हजार सैनिक एका बाजूस आणि अंदाजे दोन लाख दुसऱ्या बाजूस ! हा फक्त लढवैय्यांचाच आकडा होता. त्यांच्या ब्राह्मणांच्या पंचायतीने दोन्हीकडील सैन्यशक्तीचा आणि शस्त्रांत्रांचा काळजीपूर्वक अभ्यास करून यादी बनवली होती. अशा प्रकारे यादी बनविणे व आकडेवारी करणे हा ब्राह्मणांचा गुण होता. चौसष्ठ कला, एकशेआठ श्रृंगारिक आसने, देहान्त शिक्षेस योग्य दहा दुष्कृत्ये वगैरे अशा अनेक प्रकारच्या याद्या त्यांच्या संग्रही होत्या. खरे म्हणजे ब्राह्मणांच्या पोटजातीची पण यादी करता येईल. ह्या ब्राह्मणांच्या पोटजातीतील प्रत्येकजण स्वतःला दुसऱ्यापेक्षा श्रेष्ठ समजत. पेशवे व नाना फडणीसांमुळे त्यावेळी

कोकणस्थांना अधिक मान व सत्ता होती. त्यापूर्वी देशस्थांचे वर्चस्व होते. नंतर कदाचित् सारस्वत, तेलंगी अथवा उत्तरेकडील गौड हे वरचढ होतील किंवा कदाचित ब्राह्मण नसलेली दुसरीच जात सत्ता मिळवील. शिंदे शेतकरी होते तर होळकर गुराखी होते. या यादी बाहेरचे, सत्तेची हाव नसलले कऱ्हाडे पेरॉंला अधिक पसंत होते. हे खरे ब्राह्मण, खरे पंडित होते. अल्पसंतोषी, निर्दोष, उत्तम गणितज्ञ आणि उत्तम लेखक ! त्यांना अशा प्रकारची ईश्वरदत्त देणगी होती.

एका कऱ्हाडा ब्राह्मणाने, एका भल्या मोठ्या नकाशावरील एका ठिपक्यावर बोट ठेवून पेरॉंस सांगितले, " हे खर्डा. " नंतर ते बोट पूर्वेकडे सरकावून तो म्हणाला, "ह्या टेकडीच्या मागे." ही जागा लाखेरीची आठवण करून देत होती. लाखेरीप्रमाणेच जंगलांनी वेढलेल्या, कमी उंचीच्या टेकड्या, फारशी खोल व दलदल नसलेली दरी ! लढण्यासाठी योग्य अशी जागा निवडली गेली होती.

नंतर द बुआन्यला ह्या युद्धाची माहिती कळविताना पेरॉंने लिहिले होते, " ह्या शेवटच्या मोठ्या लढाईत मी सहभागी झालो नसतो तर मला कधीच कळले नसते की हिंदुस्थानी लोक लढतानाही दाक्षिण्याचे सर्व नियम कसे पाळतात ! सगळे लढायचे म्हणून लढत होते. जिंकण्यासाठी नव्हे तर विश्वास देण्यासाठी !

निजामाने त्याचे सर्व जुने लष्कर एकत्र बोलावले. नवे लष्करही मदतीस होतेच. मराठ्यांच्या चढाईला रोखण्यासाठी व त्यांनी फार पुढे येवू नये म्हणून निजाम स्वत: सर्वप्रथम आपली भूमी सोडुन बाहेर पडला. नाना फडणीसांनी आपल्या सर्व सरदारांना त्यांच्या लष्करासह बोलावून घेतले होते. शिंदे आले होते आणि त्यांच्या बाजूला त्यांचे पूर्वीचे कट्टर शत्रू होळकरही होते. पेरॉं आणि द्युद्रनेक खांद्याला खांदा भिडवून उभे होते. नागपूरच्या सरदार भोसल्यांनी प्राचीन पद्धतीने तिरंदाजाचे सैन्य आणले होते. नव्या अत्याधुनिक लष्कराच्या बरोबर हे प्राचीन पद्धतीचे सैन्यही होते. इतक्या एकजुटीचे आणि शक्तीचे प्रदर्शन पाहून, न लढताच निजाम शरण येईल आणि मराठ्यांना येणे असणारी खंडणी देण्याचे मान्य करील असे नाना फडणीसांना वाटले होते.

जेव्हा दोन बलाढ्य पक्ष एकमेकासमोर उभे ठाकतात तेव्हा कोण जिंकणार हे दैवच ठरविते. ११ मार्च १७९५ रोजी संध्याकाळी खर्डा येथे निजामाच्या जनानखान्यातील स्त्रियांनी पुण्याच्या बाजूने अनुकूल कौल दिला होता. त्यांच्या मालकांनी, आपल्या बलाढ्य सैन्याला पाहून शत्रू नक्की घाबरेल असे गृहित धरून, आपल्या सर्व बेगमांना व जनानखान्यातील इतर स्त्रियांना युद्धाच्या रंगभूमीवर येण्याचे आमंत्रण दिले होते. पहिल्या टप्प्यावर मोहारी येथे एका उंच टेकड्यावर ह्या सर्व



स्त्रियांची रहाण्याची व्यवस्था केली होती. ५ मार्च पासून, ह्या उंच स्थानावरून, या स्त्रियांना दूरवर पश्चिमेकडे मराठ्यांच्या सैन्याचा तळ दिसत होता. तसेच दोन्ही पक्षाचे सैन्य समोरा समोर उभे होते तो खोलगट भागही त्यांच्या दृष्टिपथात होता. नाना फडणीसांनाही आपल्या प्रचंड सैन्याच्या शक्तीची खात्री होती म्हणून त्यांनी पण सर्व सरदारांना आणि अधिकाऱ्यांना आपआपला कुटुंबकबिला बरोबर आणण्यास परवानगी दिली होती. मोहिमेवर जातांना कुटुंबकबिला बरोबर नेण्याची त्या काळी पद्धतच होती. मधूने ही आपले उंट तयार केले. आपली बहीण आन व भाऊ लुई यांच्यासह ती युद्धभूमीवर पोहोचली. यमुनाबाईसही आपल्या बरोबर येण्यास तिने कळविले. सैनिकांना लागणारा शिधा व नित्योपयोगी वस्तूंचा बाजार जिथे होता तेथे मधूने आपला डेरा ठोकला.

ह्या रात्री मराठा तळावर दीपोत्सव होता. फटाके उडाले. युद्धासाठी नव्हे तर उत्सवासाठी ! धर्मनिष्ठ ब्राह्मण सेनापतींसह हिंदू सैनिकांनी होळीचा सण मोठ्या उत्साहाने साजरा केला.

निजामाच्या लष्करात मराठा सैनिकांचा इतका मोठा भरणा होता की शत्रूपक्ष उत्सवात मग्न असल्याचा फायदा घेऊन त्यांच्यावर तुटुन पडावे हा विचारही मुसलमान सेनापती करू शकत नव्हते. त्यांच्या बेगमांनी संगीताचा कार्यक्रम आयोजित करून सर्वांना तातडीने बोलावून घेतले. दुसऱ्या बाजूच्या टेकड्यांवर शत्रूपक्ष होळी पेटवून आनंदोत्सव साजरा करीत होता. ते पाहून ह्यांनाही ही सुंदर रात्र चांदण्याखाली बसून सुंदर श्रृंगारिक गझला ऐकण्यात घालवावी असा विचार सुचला. कृष्णाने गोपींबरोबर केलेल्या श्रृंगारिक लीलांचे वर्णन करणारी गाणी हिंदू गात होते. त्याचवेळी लैलामजनूच्या प्रेमकथांचा आस्वाद मुसलमान घेत होते.

झोपेशिवाय घालविलेल्या ह्या रात्रीनंतर अधिकारी मंडळी पुढील काही दिवस विश्रांती घेत होते. तर टेहळणी करणारे सैनिक शत्रूपक्षास मधूनमधून आव्हान देत होते. प्रत्येक पक्षास दुसरा पक्ष माघार घेईल असे वाटत होते. आता शत्रूपक्षाची परीक्षा घेण्याची वेळ आली आहे असे ठरवून ८ मार्च रोजी पेरॉंने आपल्या उंटदळा-मार्फत चढाईस सुरुवात केली. हे उंटदळ अग्निबाण फेकणाऱ्या तोफांनी युक्त होते. ज्या टेकडीवर नबाबांचा जनाना होता त्या टेकडीच्या उतरंडीवर त्याने अग्निबाणांचा वर्षाव केला. म्हणून ह्या स्त्रियांनी त्यांचा तळ अधिक सुरक्षित जागी न्यावा अशी मागणी केली. त्याप्रमाणे ११ तारखेस पहाटे हा तळ हलविण्याचे काम सुरू झाले. पेरॉंने जेव्हा ही हालचाल पाहिली तेव्हा त्याला फार उशीर झाला होता. त्याच्या दुर्बिणीतून त्याला फक्त जनरल रेमॉंचे लष्कर ओळखता आले. हे लष्कर पाठीमागच्या